## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४८ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०७/२०१७

**१) महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०७/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले घरासमोरील आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी उभी राहुन आरोपी यास तुम्ही माझे नाव घेवुन शिवीगाळ का करता असे विचारले असता आरोपीने तु माझ्या पत्नीस का शिकवितेस असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) सार्वजनिक ठिकाणी दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०७/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल दारू पिऊन दारूचे नशेत जिल्हा परीषद चौक भंडारा येथे मिळुन आल्याने त्याचे सामान्य रुग्णालय भंडारा येथे वैद्यकीय तपासनी केली असता वैद्यकीय अहवाल वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साबडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन वाहनाचे सोबत कागदपत्रे न बाळगता येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

**अ)** दिनांक ०१/०७/२०१७ चे ०४.०० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील टिप्पर क्र. ३६/ए. ए. ५४८४ ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने व सोबत वाहनाचे कागदपत्र न बाळगल्याने पोस्टे. साकोली येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०१/०७/२०१७ चे ०४.०० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील टिप्पर क्र. ३६/ए. ए. ०२५५ ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने व सोबत वाहनाचे कागदपत्र न बाळगल्याने पोस्टे. साकोली येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०१/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे करडी, अडयाळ येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारु किंमती २०००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०१/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनी. वी.डी. कोडपे
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९७६४३८२२१४

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.